**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळाच्या पुढच्या अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा आणण्याची सरकारची विधानपरिषदेत ग्वाही

- महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक विधानपरिषदेतही मंजूर, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा मार्ग मोकळा

- गेल्या महिन्यात चलनफुगवट्याच्या दरात  घसरण

- भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि इतरांचा अंतराळ स्थानकातून  परतीच्या प्रवास सुरु

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारत पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

राज्य सरकार लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणेल, असं गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. दौंड तालुक्यात केडगाव इथल्या पंडिता रमाबाई मुक्ती मिशन संस्थेत शिकणाऱ्या मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती, त्यांच्याशी चुकीची वर्तणूक इत्यादी आरोपांच्या अनुषंगानं आमदार उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक पदावरच्या महिला अधिकाऱ्याची समिती नेमली असून तिचा अहवाल एका महिन्यात मिळेल, त्यानंतर अहवालानुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

राज्यात बळजबरीनं धर्मांतर करण्याच्या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांची समिती आधीच कार्यरत असून या समितीच्या अहवालानुसार राज्य सरकार धर्मांतरविरोधी कायदा करेल, असं ते म्हणाले…..

**होल्ड - बाईट - भोयर**

या वर्षी मार्च महिन्यात हैदराबादहून जेएनपीटीच्या दिशेने निघालेल्या दोन कंटेनर्समध्ये सुमारे ५७ हजार किलो गोमांस सापडल्याप्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना करून चौकशी करण्याची घोषणाही भोयर यांनी केली. येत्या अधिवेशनात गोतस्करीबंदी कायदा आणू, असं आश्वासन त्यांनी दिलं. गोरक्षकांवर लागलेल्या आरोपांचा अभ्यास करून ते मागं घेतले जातील, असं ते म्हणाले.

मृद आणि जलसंधारण विभागातल्या एकूण ८ हजार ६६७ पदांच्या भर्तीला उच्चस्तरीय समितीनं मंजुरी दिली असून, लवकरच भरती प्रक्रिया सुरू होणार असल्याचं या खात्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितलं.

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ ला आज विधानपरिषदेनं मंजुरी दिली. हे विधेयक विधानसभेनं आधीच मंजूर केलं आहे. त्यामुळे राज्यात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर एनडीपीएस कायद्यासोबतच मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) ( दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ ही आज विधानपरिषदेत मंजूर झालं.

**<><><><><>**

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ चलनफुगवट्याचा दर गेल्या जून मधे मे महिन्याच्या तुलनेत ७२ शतांशांनी कमी झाला आहे. मे महिन्यात हा दर २ पूर्णांक ८२ शतांश टक्के होता. तो जूनमधे २ पूर्णांक १ दशांश टक्के पर्यंत खाली आला. जानेवारी २०१९ पासूनचा हा चलनफुगवटा दराचा नीचांक आहे. या महिन्यात भाज्या, अन्नधान्य, मांस, मासे,मसाले तसंच साखर आणि दुग्धजन्य

पदार्थांचे भाव कमी राहिल्यानं ही घट दिसून येत असल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेली आकडेवारी सांगते.

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर उणे १३ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांपुढच्या, कचरा व्यवस्थापनातल्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत सांगितलं. नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये कचऱ्याचं योग्य वर्गीकरण होणं अत्यावश्यक आहे. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना आधीच सूचना दिल्या आहेत. राज्य शासनाकडून अशा सर्व ठिकाणी आवश्यक ती मदत दिली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणीला सुरुवात करू, असं सांगत न्यायालयानं आज सुनावणी पुढं ढकलली. आज, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत त्यामुळे आता नव्यानं अर्ज करणं बंद करावं, असं त्यांनी ठाकरे गटाला सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ऑक्सिओम-4 मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी आज अतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघाले आहेत. निर्धारित वेळेपेक्षा १५ मिनिटे विलंबानं स्पेस एक्सचं ड्रॅगन अंतराळ

यान अंतराळ स्थानकापासून विलग झालं. उद्या दुपारी तीन वाजता हे अंतराळ यान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरेल.

(त्यानंतर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील).

या मोहिमेअंतर्गत 14 दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत. अंतराळ स्थानकातून निघण्यापूर्वी शुक्ला यांनी सांगितलं, ...

**होल्ड - बाईट- शुभांशु शुक्ला**

**- <><><><><>**

राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांनी दोन नवीन राज्यपाल आणि एका नायब राज्यपालांच्या नियुक्त्या आज जाहीर केल्या. यात हरियाणाच्या राज्यपालपदी प्रोफेसर अशीम कुमार घोष, गोव्याच्या राज्यपालपदी पशुपती अशोक गजपती राजू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखचे नायबराज्यपाल निवृत्त ब्रिगेडिअर डॉ. बी.डी. मिश्रा यांचा राजीनामा राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांनी स्वीकारला असून त्यांच्या जागी कविंदर गुप्ता यांची नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

५७ व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमधे जळगावच्या देवेश पंकज भैया या विद्यार्थ्याने सुवर्ण पदक मिळवलं आहे. तसंच हैद्राबादचा संदीप कुची यालाही सुवर्णपदक मिळालं असून भुवनेश्वरचा देबदत्त प्रियदर्शी आणि नवी दिल्लीचा उज्ज्वल केसरी या विद्यार्थ्यांनी रौप्य पदकं मिळवली आहेत. संयुक्त अरब अमिरातींमधे दुबई इथं ५ जुलैला सुरु झालेल्या या ऑलिंपियाडचा आज

समारोप झाला. ९० देशांनी त्यात सहभाग नोंदवला असून पदक तालिकेत भारताला सहावं स्थान मिळालं.

**<><><><><>**

देशाचा सर्वांगिण विकास तसंच समृध्दीसाठी शाळांनी आणि विद्यापिठांनी विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता वाढवण्यावर विशेष भर द्यावा, अशी सूचना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आज नांदेड इथं केली. ते अभिनव भारत शिक्षण संस्थेनं नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात आयोजित केलेल्या त्यांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. देशाचे माजी गृहमंत्री, राज्याचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. नांदेडमध्ये धनेगाव इथल्या शंकरराव चव्हाण यांच्या समाधीस्थळावर माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आमदार श्रीजया चव्हाण यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सुनिल बंडगर यांचं आज पहाटे सोलापूरमधे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ते ५० वर्षांचे हेते. त्यांच्या पार्थिवावर मैंदर्गी इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचे खंदे समर्थक म्हणून सुनील बंडगर सोलापूर जिल्ह्यात प्रसिद्ध होते.

**<><><><><>**

एसटीचं खाजगीकरण कदापि होणार नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असं परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. मुंबईतल्या परळ बसस्थानकात एसटी कर्मचारी आणि प्रवाशांसाठी जलशीतकाचे लोकार्पणाच्या कार्यक्रमात सरनाईक बोलत होते.

**<><><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारत पराभवाच्या छायेत आहे. लॉर्ड्स मैदानावर सुरु असलेल्या या सामन्याच्या पहिल्या डावात दोन्ही संघांनी प्रत्येकी ३८७ धावा केल्या होत्या. इंग्लडचा दुसरा डाव १९२ धावांवर गुंडाळण्यात आज भारताला यश आलं. मात्र या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची फलंदाजी पूर्णपणे गडगडली. के एल राहुलच्या ३९ धावा ही या डावातली भारताची सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली. यशस्वी जैस्वाल आणि वॉशिंग्टन सुंदर एकही धाव न करता तंबूत परतले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ८ बाद १३५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र , मराठवाडा आणि  विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही भागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**